वर्ष १८ वे

अंक १ ला

**इतरांनी आपल्यावर ठेवलेला विश्वास हीच आपली खरी कमाई आहे.**
**तो विश्वास सार्थपणे पेलवणे हीच आपली जबाबदारी आहे.**




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

**(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)**

**Website : http://www.parnermitramandalpune.com/**

**यांचे मुखपत्र**

# संवाद

### नियोजित वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट)
- राहिलेल्या बांधकामाचा अपेक्षित खर्च **रु. एक कोटी**
- प्रत्येक मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या
- खोलीचा आकार १०' x १४'
- एकूण **१६०** विद्यार्थ्यांची सोय.

**डिसेंबर २०१७**
**जाने.-फेब्रु.-मार्च २०१८**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

### आपण यापैकी काय करु शकतो?

- **रु. दहा लक्ष** व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- **रु. एक लक्ष** व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- **रु. ११,०००** व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

- **तळमजला व दोन मजले बांधून पूर्ण झाले असून त्यामध्ये ८० विद्यार्थी राहात आहेत.**

# संपादकीय

प्रिय सभासद बंधु व भगिनींनो,

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दि. ६ ऑगस्ट २०१७ रोजी पारनेर तालुका मित्र मंडळाचा वार्षिक स्नेहमेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव समारंभ पार पडला. त्यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये विशेष करून अहमदनगर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स व सायन्स कॉलेजचे **प्राचार्य डॉ.भास्करराव झावरे** तसेच संरक्षण खात्यातील **ब्रिगेडियर भालसिंग** यांची उपस्थिती लक्षणीय होती. तसेच त्यांनी केलेले मार्गदर्शनही मोलाचे होते. गुणवत्ता असेल तर ग्रामीण भागातील रत्नेही समाजासमोर येतात, तथापि त्यासाठी प्रयत्न मात्र करावे लागतात, हेही त्यांचे कर्तृत्वाच्या माध्यमातून अधोरेखीत झाले आहे. या द्वयींचे मंडळातर्फे मी आभार मानतो. तसेच यावर्षी कार्यक्रमास अनेक पारनेरकरांनी उपस्थिती दाखविली, त्याबद्दल त्यांचे प्रतीही मी कृतज्ञता व्यक्त करतो.

आपल्या थेरगाव येथील **विद्यार्थी वसतिगृहाच्या तिसऱ्या व चौथ्या मजल्याचे बांधकाम पूर्ण होत आले आहे.** तेथे **ग्रंथालय व अभ्यासिका** सुरू करण्याचा आमचा मानस आहे. त्याबाबत आपल्या काही सूचना असल्यास आम्हास कळविण्याबाबत मागील अंकात मी आवाहन केले होते. तथापि, आतापर्यंत कोणीही आम्हास सूचना अथवा मार्गदर्शन केलेले नाही. ते कृपया करावे म्हणजे आम्हास सकारात्मक पाऊल पुढे टाकणे शक्य होईल.

आपणा सर्वांना मी वारंवार आवाहन करीत आलो आहे की, आपल्या वसतिगृहाचे तिसऱ्या व चौथ्या मजल्यावरील कामकाज सुरू करण्यासाठी आपण सढळ हाताने मदत करावी. या जनरथाला आपण आपला एक हात आर्थिकरूपाने दिल्यास हा ज्ञानरूपी रथ त्वरीत पुढे ढकलला जाईल.

पोलिस सेवेतील राष्ट्रपती पदक विजेते **श्री.भिमाजी घोरपडे** यांचे कर्तृत्व या अंकामध्ये उधृत केले आहे, ते कृपया आपण वाचावे. या वर्षी पारनेर तालुका मित्र मंडळाच्या कार्याची आपण चांगल्या प्रकारे दखल घेतल्याबद्दल आपले आभार मानून मी या संपादकीयास अर्धविराम देतो!

जय जिजाऊ । जय शिवराय ।।

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक

## विजयकुमार ठुबे यांची इंडियन रोड्स काँग्रेसवर निवड !



**इंडियन रोड्स काँग्रेस या स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील स्वायत्त संस्थेवर महाराष्ट्र राज्य वखार महामंडळचे व्यवस्थापकीय सहसंचालक तथा सचिव इंजिनियर विजयकुमार ठुबे यांची राष्ट्रीय पातळीवरील कौन्सिल मेंबर म्हणून बहुमताने निवड झाली आहे. राज्यातून निवड झालेले ते एकमेव स्थापत्य अभियंता आहेत.** श्री.ठुबे हे पारनेर तालुक्यातील कान्हूर पठार येथील रहिवासी असून मराठा पतसंस्था, अहमदनगर व कान्हूर परिसर अभियंता प्रतिष्ठानचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत. तसेच पुण्यात पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे च्या बांधकाम समितीचे सुद्धा अध्यक्ष आहेत. मंडळाच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह चालविले जाते व गरीब विद्यार्थ्यांना मदत केली जाते.

इंडियन रोड्स काँग्रेस ही सन १९३४ साली केंद्र शासनाकडून स्थापन झालेली स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील स्वायत्त संस्था आहे.या संस्थेचे संपूर्ण भारतातील अभियांत्रिकी क्षेत्रातील १३ हजार पेक्ष्या जास्त सक्रीय सभासद आहेत.केंद्रीय व राज्य शासनातील सर्व स्तरातील,स्थापत्य अभियंता,अभियांत्रिकी महाविद्यालय,सरक्षण खात्यातील पायदळ,सीमा रस्ते संघटना,रस्ते संशोधन संस्था, तसेच सर्व स्थानिक संस्था व व्यावसायिक संस्थेतील स्थापत्य अभियंता या काँग्रेसचे सभासद आहेत.

रस्ते बांधणीमध्ये उच्च गुणवत्तेसाठी प्रयत्न करणे,भारतातील अभियत्यांना मार्गदर्शन करणे,भारतामध्ये आर्थिक प्रगती व चांगल्या मानवी आयुष्यची पातळी उंचवण्यासाठी वाहतूक नियमन करण्यासाठी जनतेमध्ये जागृती करणे,पर्यावरण समतोल राखून बांधकाम तंत्रज्ञान वाढविणे,गुणवत्ता वाढविण्यासाठी तांत्रिक ग्रन्थालय व संग्राहलय उभारणे,संशोधन व विकास यंत्रणा उभारणे,बांधकाम क्षेत्रातील कौशल्य विकसित करणे,बांधकाम पद्धतीच्या कामांची मानके तयार करणे आदी कामे इंडियन रोड्स काँग्रेस करते.

नुकत्याच बंगळूर येथे झालेल्या **इंडियन रोड्स काँग्रेसच्या ७८ व्या अधिवेशनात श्री.ठुबे यांची कौन्सिल मेंबर म्हणून निवड करण्यात आली**.या निवडीत सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंत्यांचा सहभाग आहे. या निवडी बद्दल श्री ठुबे यांचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता तसेच पारनेर तालुका मित्र मंडळाचे सर्व कार्यकारिणी सदस्य व सभासद यांचेतर्फे अभिनंदन!

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम वृत्तांत

पारनेर तालुका मित्र मंडळाचा वार्षिक स्नेहमेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम तसेच वार्षिक सर्वसाधारण सभा दि.०६.०८.२०१७ रोजी इन्स्टिटयूट ऑफ इंजिनियर्स, शिवाजीनगर, पुणे येथे सकाळी १०.०० ते २.०० या वेळात संपन्न झाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस व्यासपीठावरील सर्व मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार व पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमास सुरूवात झाली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष **मा. ब्रिगेडियर भीमराज भालसिंग** यांचा सत्कार मंडळाचे उपाध्यक्ष **श्री.मधुकर शिरोळे** यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे **मा. भास्करराव झावरे, प्राचार्य – न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहमनदगर** यांचा सत्कार सहकार्यवाह **श्री.अशोक वाबळे** यांनी केला. मंडळाचे अध्यक्ष यांचा सत्कार **मा.ब्रिगेडियर भालसिंग** यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करताना **प्रा. सुनील राजेनिंबाळकर** यांनी मंडळाच्या आतापर्यंत चाललेल्या वाटचालीच्या संदर्भात अलंकारिक भाषाशैलीत कल्पकतापूर्वक माहिती दिली. आपल्या तालुक्यातील माणसे बुद्धीमत्तेच्या जोरावर खूप प्रगतीपथावर वाटचाल करीत आहेत हे सांगताना **'पिंपळाचे रोपटे कुठेही उगवते, म्हणून त्याचे कसेही निभावते'** असा खास उल्लेख केला. मंडळाच्या विद्यार्थी, ग्रामस्थ गौरवाबरोबरच जुने कपडे, जुन्या सायकली घेऊन गरजवंतांना देणे, विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीरे, आरोग्य शिबीरे, गरजू आजारी व्यक्तींना मदत करणे, इ. कामे मंडळातर्फे चालू असतात. पाराशर ऋषी, संत निळोबाराय व सेनापती बापटांची ही कर्मभूमी असल्याचा त्यांनी गौरवपूर्वक उल्लेख केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष **मा. ब्रिगेडियर भीमराज भालसिंग** यांचा परीचय **सौ.स्नेहल प्रभात शिर्के** (मंडळाचे सदस्य **श्री.रामदासजी शिर्के** यांच्या सुनबाई) यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे **प्राचार्य भास्करराव झावरे** यांचा परिचय **इंजि.विजयकुमार ठुबे** यांनी करून दिला.

सत्कारीत ग्रामस्थांच्या यादीचे वाचन प्रा.सुनील राजेनिंबाळकर यांनी केले. मा.ब्रिगेडियर भीमराज भालसिंग व प्राचार्य भास्करराव झावरे यांच्या हस्ते ग्रामस्थांचा सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांच्या वतीने सत्कारास उत्तर देताना **प्रा.डॉ.संदीप पठारे** यांनी मंडळाच्या कार्याचा यथार्थ शब्दात गौरव केला. त्याचबरोबर पुणे महानगरपालिकेचे नवनिर्वाचीत नगरसेवक **मा.श्री.संदिपजी जऱ्हाड** यांनी वडगाव शेरी हद्दीत एक जागा मिळवून वसतिगृह उभारण्याचा मनोदय व्यक्त केला.




स्नेहमेळाव्या प्रसंगी मार्गदर्शन करताना १) ब्रिगे.भालसिंग, २) प्राचार्य डॉ.भास्करराव झावरे, ३) मा.संदिप जऱ्हाड, ४) मा.संजीव सोनवणे, ५) इंजि.विजयकुमार ठुबे

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य भास्करराव झावरे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे बाबत आपला चांगला अनुभव आहे. पालक व विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन करताना ते म्हणाले, 'आपण व्यवसाय-धंद्यासाठी पुण्यात आलो. परंतु नवी पिढी पुण्यातून पुढे कोठे गेली पाहिजे यासाठी काही विचार करणे गरजेचे आहे. **छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले यांच्या कार्याचा अभिमानाने उल्लेख करीत असताना पारनेरचे दैवत असलेल्या आदरणीय पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांच्या प्रचंड कार्याचा त्यांनी यथोचित शब्दात गौरव केला.**' आपले बालपणचे खेड्यातील अनुभव सांगताना त्यांनी सांगितले की, 'आमच्यावेळी अभ्यास करण्यासाठी कोंबडा आरवल्यावर आम्ही उठायचो. पण कोंबडा आरवण्याच्या वेळा बदलायच्या त्याप्रमाणे आमचा अभ्यास व्हायचा. आता जमाना बदलला आहे. आपणाकडे वेळेची सर्व साधने उपलब्ध आहेत. तेव्हा प्रत्येकाने वक्तशीरपणा वाढवावा.' देवापुढे आजही बसायला हरकत नाही, पण बदललेल्या काळानुसार आपण बदलले पाहिजे. पारनेरकरांनी आपले क्षेत्र निवडले व त्यात नैपुण्य मिळविले. म्हणून आपण घेतलेल्या विषयातील महत्व समजून घेवून इतरांवर प्रेम करणे शिकले पाहिजे. **पाल्याच्या चुका सुधारण्यासाठी प्रयत्न करून त्याच्यावर फार न रागावता त्याच्या अपयशातही त्याला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.** बक्षीस घेताना आपण आनंद घेतो त्याप्रमाणे



छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रतिमा पुजन झाल्यानंतर
कार्यक्रमाचे मान्यवर व उपस्थित मंडळाचे सदस्य

अपयशही स्विकारून त्याला संधी, साथ व प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

**इंजि. विजयकुमार ठुबे** यांनी सांगितले की, आतापर्यंत वसतिगृहासाठी १ कोटीच्या वर खर्च झालेला आहे. अद्याप वरच्या दोन मजल्यांच्या बांधकामासाठी आर्थिक गरज आहे. फरशी, प्लास्टर, रंगरंगोटी, लाईट व नळ फिटींग इ. कामे अजून बाकी आहेत. त्यासाठी देणगीदारांना देणगी देण्याचे त्यांनी आवाहन केले.

इयत्ता १० वी च्या परीक्षेत गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन सहसेक्रेटरी **प्रा.गोरक्ष जगताप** यांनी केले तर इ. १२ वीच्या विद्यार्थी यादीचे वाचन सदस्य **प्रा.माधवराव गायके** यांनी केले. प्रमुख पाहुणे, मा.अध्यक्ष, व्यासपीठावरील मंडळाचे सर्व पदाधिकारी, तसेच प्रमुख देणगीदार यांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थी व ग्रामस्थांचा सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांना



ॲड.पोपटराव व सौ.शुभदा सोबले यांनी मंडळास रू.१,००,१११/- देणगी दिल्याबद्दल ब्रिगेडियर श्री.भालसिंग यांचे हस्ते सत्कार.



श्रीमती शारदा मोरे यांनी मंडळास रू.१ लक्ष देणगी दिल्याबद्दल कार्यक्रमाचे अध्यक्ष ब्रिगेडियर श्री.भालसिंग यांचे हस्ते सत्कार.



पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे च्या वार्षिक स्नेहमेळाव्याप्रसंगी उपस्थित सभासद व हितचिंतक.

टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला. मंडळाचे सेक्रेटरी **श्री.सुनील पोटे सर** यांनी सर्व पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे स्वहस्ताक्षरात लिहून भेटवस्तूसहीत अचूकपणे त्यांची कन्या कु.स्नेहल पोटे व कु.आर्या लामखडे यांच्यामार्फत पाहुण्यांकडे पोहचविण्याचे काम अत्यंत चोखपणे बजावले. **मा.ब्रिगेडियर भीमराज भालसिंग** यांनी राष्ट्रभाषा हिंदीतून भाषण केले. मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांवर आपले प्रभुत्व असावे असे आग्रहाने सांगितले. मंडळाच्या प्रगतीपथावर असलेल्या कार्याचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. 'विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन मिळाले तर ते आपल्या गावाचे, तालुक्याचे, राज्याचे व देशाचे नाव उज्वल केल्याशिवाय राहणार नाहीत.' 'Practice makes man perfect' हे तत्व जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक आहे. खरे तर मान द्या आणि मान घ्या असे हवे. परंतु दिवसेदिवस मोठ्यांबद्दलचा आदरभाव कमी होऊ लागला आहे. ही खंत त्यांनी बोलून दाखविली. **'आपण निवडलेला कोणताही अभ्यासक्रम अर्ध्यावर न सोडता पूर्ण करावा. आनंदात राहून अडचणींवर मात करावी. म्हणजे आपणास यश हमखास मिळेल.'**

या कार्यक्रमानंतर मंडळाची सर्वसाधारण सभा पार पडली. या सर्व कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी **श्री.भाऊसाहेब नरड सर** यांनी समर्थपणे सांभाळली. तसेच आभारही त्यांनीच मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रम समाप्तीनंतर मंडळातर्फे आयोजित केलेल्या भोजनाचा आस्वाद सर्वांनी घेतला. कार्यक्रमासंदर्भात भोजनाच्या वेळी अनेकांनी छान प्रतिक्रिया व्यक्त केल्या. त्यापैकी एक बोलकी प्रतिक्रिया – ज्येष्ठ समाजसेवक व पोलीस सेवेचे अत्युच्च राष्ट्रपतीपदक मिळालेले श्री.आबासाहेब घोरपडे, वय ८८ वर्षे, यांनी सांगितले की, 'त्यांची नात कु.उन्नती हिला १०वी मध्ये ९३% गुण मिळाल्याने ४–५ ठिकाणी सत्कार समारंभात जाण्याचा योग आला. परंतु एवढे उत्तम दर्जाचे आयोजन कोठेच दिसले नाही. मंडळाचा कार्यक्रम खूपच दर्जेदार वाटला.'

**शब्दांकन – भाऊसाहेब नरड**

**टिप :–** कार्यक्रमाचे सर्व फोटो पारनेर तालुका मित्र मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. ज्यांना हवे असतील त्यांनी ते वेबसाईटवरून डाऊनलोड करावेत ही विनंती. http://www.parnermitramandalpune.com/



स्नेहमेळाव्याप्रसंगी स्नेहभोजनाचा आस्वादा घेताना उपस्थित पारनेर तालुका मित्र मंडळाचे सभासद, विद्यार्थी व हितचिंतक.

# आपण असे केले तर

❊ **श्रीमती वासंतीबाई किसनराव क्षीरसागर** यांच्या दि. १६.८.२०१७ रोजीच्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे भाचे **प्रा. जगन्नाथ तुकाराम देंडगे**, रा. गांजीभोयरे व **श्री. नामदेव मारुती साबळे**, रा. रुई छत्रपती यांनी मंडळास अनुक्रमे **रु.१०००/- व रु.१,५००/-** देणगी दिली.



❊ **कै.भगवान काशिनाथ काळे** सर रा. गोरेगाव यांच्या दिनांक १९.१०.२०१७ च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र **श्री.अनिकेत** यांनी **रु.१०००/-** देणगी दिली.




❊ **चि. सोहम** यांच्या दिनांक ४.९.२०१७ च्या वाढदिवसा निमीत्त पिताश्री **श्री.तुकाराम विठ्ठल नरसाळे**, रा. गोरेगाव यांनी मंडळास **रु. १०००/-** देणगी दिली.



❊ **कै. सदाशिव किसन शिंदे व कै. श्रीमती सिंधु सदाशिव शिंदे** रा. सारोळे आडवाई यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.प्रविण** यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ **सौ.छायाताई शांतीलालजी चुत्तर**, रा.कान्हूर पठार यांनी त्यांच्या दि.०४.०९.२०१७ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **कै. दत्तात्रय नाना खोसे** रा.पाडळी दर्या यांच्या दि.२०.०२.२०१८ च्या व **कै.भामाबाई दत्तात्रय खोसे** यांच्या दि.१९.०९.२०१७ च्या स्मृतीदिनानिमित्त त्यांचे सुपुत्र **श्री.गणेश** यांनी मंडळास **रु.११२५/-** देणगी दिली.



❊ **कै.प्रा. मुकुंद दत्तात्रय वाघमारे** रा. पारनेर यांच्या दिनांक २३.१०.२०१७ च्या स्मृतीनिमित्त त्यांच्या पत्नी **श्रीमती मृदुला** यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



❊ **कै. कृष्णाबाई सुखदेव पोटे**, रा.बाभुळवाडे यांच्या दि.२८.०७.२०१७ च्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र **श्री.कुंडलीक सर** यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



❊ **श्री.अरूण शंकरराव देंडगे**, रा.गांजीभोयरे यांनी त्यांची नात **कु.स्वरा श्रीराम देंडगे** हिच्या दि.२९.०९.२०१७ च्या वाढदिवसा- निमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. विजयकुमार गोविंदराव ढुबे**, रा.कान्हुरपठार यांनी त्यांच्या दिनांक ०१.११.२०१७ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. विजयकुमार गोविंदराव ढुबे**, रा. कान्हुरपठार यांनी त्यांचे सुपुत्र **चि. श्रेयस** याच्या दिनांक २९.११.२०१७ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.




❊ **कै. विष्णुपंत बापुराव कुलकर्णी**, रा.बाभुळवाडे यांच्या दिनांक ०२.०९.२०१७ च्या स्मृतीनिमित्त त्यांचे सुपुत्र **श्री.संतोष** यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.

❊ **श्री.सुधाकर पाराजी आढाव**, रा.सांगवी सुर्या यांनी **पिताश्री कै.पाराजी भाऊ आढाव व मातोश्री कै.सौ.कुसुमबाई पाराजी आढाव** यांचे स्मृतीप्रित्यर्थ्य मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

❊ **श्री.गंगाधर भिवा कोठावळे**, रा.सांगवी सुर्या यांनी **पिताश्री कै.भिवा शिवराम कोठावळे** यांच्या दि.१७.१०.२०१७ रोजीच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.




❊ **श्री.प्रमोद दत्तात्रय काळे**, रा.शहाजापूर यांनी त्यांच्या दि.०१.११.२०१७ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **डॉ. सुधाकर रामचंद्र खराडे**, रा. निघोज यांनी त्यांच्या दि. ३१.१०.२०१७ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री.अरूण शंकरराव देंडगे**, रा. गांजीभोयरे यांनी त्यांचे पिताश्री **कै. शंकरराव हरिभाऊ देंडगे** यांचे दि.०२.११.२०१७ रोजीच्या स्मृतीदिनानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **सौ. रेखा सुनील शेटे**, रा.पारनेर यांनी त्यांचे सुपुत्र **चि.श्रेयस** याच्या दि.३०.०७.२०१७ च्या वाढदिवसा निमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

❊ **ॲड.पद्माकर मार्तंड पोळ**, रा.पारनेर यांनी त्यांचे पिताश्री **कै.ॲड.मार्तंड मल्हार पोळ** यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मंडळास **रू.१००१/-** देणगी दिली.



❊ **कै.सौ.सुशिला मारूती पोटघन**, रा.जातेगाव यांच्या दि.१७.०८.२०१७ रोजीच्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र **अविनाश** यांनी त्यांच्या मातोश्री मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

# निधन वार्ता



❋ **संभाजी दगडू कपाळे,** वय ४८ वर्षे, रा.भाळवणी यांचे दि.१५.०६.२०१७ रोजी निधन झाले.



❋ **अरूण फकीरा हरेल,** वय **६५** वर्षे, रा.हिवरे कोरडा यांचे दि.०७.०७.२०१७ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृती प्रित्यर्थ सुपुत्र श्री.तुषार यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❋ **सौ.वेणूताई बाबाजी शेरकर,** वय **७५** वर्षे, रा.तराळवाडी यांचे दि.२७.०७.२०१७ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृती प्रित्यर्थ कन्या सौ.अरूण अभिमान तराळ यांनी मंडळास **रू.२००२/-** देणगी दिली.



❋ **बबनराव विठोबा झरेकर,** वय **७३** वर्षे, रा. कोहोकडी यांचे दि.३०.०७.२०१७ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृती प्रित्यर्थ सुपुत्र श्री.शशीकांत यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❋ **नामदेव शंकर केदार,** वय **६९** वर्षे, रा. जामगाव यांचे दि.०२.०८.२०१७ रोजी निधन झाले.



❋ **सौ. चंद्रकला बाळासाहेब झावरे,** वय **४४** वर्षे, रा.गारगुंडी यांचे दि.०३.१०.२०१७ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृती प्रित्यर्थ त्यांचे पती **श्री.बाळासाहेब** यांनी मंडळास **रू.२०१७/-** देणगी दिली.



❋ **सुरेश नागनाथ ठाणगे,** वय ५२ वर्षे, रा.तिखोल यांचे दि.१३.१०.२०१७ रोजी निधन झाले.



❋ **श्रीमती शांताबाई तुकाराम ढुबे,** वय ७७ वर्षे, रा.कान्हुर पठार यांचे दि.२१.१०.२०१७ रोजी निधन झाले.




❋ **गंगाधर लहानू मोरे,** वय **१०२** वर्षे, रा.वडझिरे यांचे दि.०८.११.२०१७ रोजी निधन झाले.




❋ **तुकाराम बाबासाहेब रासकर,** वय **७०** वर्षे, रा.पिंपळनेर यांचे दि.१८.१०.२०१७ रोजी निधन झाले

# अभिनंदन



❋ **कु.श्रुती महेश वराळ,** रा. निघोज ही २०१७ मधील **प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा** महाराष्ट्र राज्यामध्ये ३०० पैकी **२४०** गुण मिळवून, तिची **पुणे शहर विभागात १८५ क्रमांकाने निवड** झाली.




❋ **कु.समृद्धी हेमंत नागवडे,** रा. रूई छत्रपती हिला **१०वी मध्ये ९४.४ टक्के गुण** मिळाले.



**कु.प्राजक्ता प्रविण शिंदे** रा.सारोळे अडवाई हिला **१०वी मध्ये ९४ टक्के गुण** मिळाले.



❋ **कु. नेत्रा बाबासाहेब औटी** रा.पारनेर हिला **१०वी मध्ये ८३ टक्के गुण** मिळाले.



❋ **कु. प्राची रमेश खणकर** रा.बाभुळवाडे हिला **१२वी सायन्समध्ये ६८ टक्के गुण** मिळाले.



❋ **कु. प्रतिक गोकुळ झावरे** रा.गारगुंडी या विद्यार्थ्याची १२ वी सायन्सनंतर **आयआयटी खरकपूर** या संस्थेमध्ये **गुणवत्तेवर निवड** झाली.



❋ **कु. स्नेहल बळवंत जाधव** रा.नारायण गव्हाण हिला **बी.ई. (ई.अँड टी.सी.) मध्ये** ६८ टक्के गुण मिळाले.



❋ **कु.श्रावणी सुनील निंबाळकर** रा. गांजीभोयरे हिला **इंटर-मिजीएट ड्रॉईंग परीक्षेमध्य ए ग्रेड** मिळाली.



❋ **श्री.बाळासाहेब भिकाजी रेपाळे,** रा.पुणेवाडी यांची पोलीस खात्यामध्ये **सहा.पोलीस फौजदार** या पदावर **पदोन्नती** झाली.

# निधन वार्ता

❋ **धनंजय बबनराव झेंडे,** वय **४२** वर्षे, रा.चिखली ता.श्रीगोंदा यांचे दि.०६.१०.२०१७ रोजी निधन झाले.

❋ **सौ.मंगल हरी उर्फ बाबा खोसे,** वय ४२ वर्षे, रा.पाडळी दर्या यांचे दि.१३.१०.२०१७ रोजी निधन झाले.

❋ **डॉ.गिरीष दत्तात्रय ढुबे,** वय **४३** वर्षे, रा.कान्हुर पठार यांचे दि.२६.१०.२०१७ रोजी निधन झाले.

प्रासंगिक ...

# भिमाजी उर्फ आबासाहेब मळुजी घोरपडे



पारनेर तालुक्यातील चिंचोली गाव हे अतिशय निसर्गरम्य ठिकाण आहे. गावाच्या सर्व बाजुनी डोंगर असल्यामुळे गाव छोटेसे असले तरी लगेच नजरेत भरते. मळगंगा देवीच्या मंदिरामुळे गाव पंचक्रोशीत प्रसिद्ध पावलेले. आबासाहेबांचे चिंचोली हे गाव. घरी शेतीचा व्यवसाय. घरात आबासाहेब जेष्ठ. एकंदर ९ बहिण भावंडे. जेष्ठ असल्यामुळे नाही म्हटले तरी घराची जबाबदारी आलीच. घरची शेती असल्यामुळे लहानपणापासून कष्ट करण्याची सवय. त्यामुळेच आज ८८ व्या वर्षी सुद्धा त्यांची कामाची तडफ तरूणांना लाजवणारी आहे. घरच्या परिस्थितीमुळे जास्त शिक्षण घेता आले नाही. ७वी नंतर ते पोलीस खात्यात भरती झाले. त्यांचे पाहून त्यांचे सर्व बंधू निरनिराळ्या क्षेत्रात कार्यरत झाले. आज हे कुटुंब सुशिक्षीत व सुसंस्कृत म्हणून ओळखले जाते.

कोणतेही काम झोकून करणे ही आबासाहेबांची खासीयत. त्यामुळेच पोलीस खात्यात असताना अगदी क्लिष्ट गुन्ह्यांचा तपास आबासाहेबांकडेच असायचा. त्यांनी सुद्धा आपल्या वरीष्ठांची कधीच निराशा केली नाही. या त्यांच्या धाडसी व कर्तव्य परायणतेमुळे त्यांना पोलीस सेवेचे अत्युच्च असे **'राष्ट्रपती पदक'** प्रदान करण्यात आले. मला आठवते, १९७९ साली पारनेर तालुका मित्र मंडळाची स्थापना झाल्यानंतर ते मंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमात आवर्जून उपस्थित राहात. त्यामुळे तरूण कार्यकर्त्यांना काम करण्याचे बळ मिळत असे. आबासाहेब १९८७ मध्ये पोलीस सेवेतून निवृत्त होऊन वडगाव शेरी परीसरात राहू लागले. पोलीस खात्यातील दगदगीची व कायम गुन्हेगारांच्या संपर्कात आयुष्य गेल्यामुळे स्वभावसुद्धा सर्वसाधारणपणे संशयी होतो. त्यामुळे ही माणसे फारशी समाजात मिसळत नाहीत.

आबा त्याला अपवाद ठरले. गुन्हेगारांचे कर्दनकाळ आबा कल्पना करवत नाही अशा धार्मिक कार्यात समरस होऊ लागले. सुरुवातीला हे जमवून घेण्यात त्यांना खूप त्रास झाला. पण त्यांनी ते करून दाखविले. वडगाव शेरीमध्ये स्वामी समर्थ मंदिराच्या उभारणीमध्ये त्यांना सक्रीय भाग घेण्यास सुरुवात केली. अन्य भावीकांना वाटायचे की, पोलीस खात्यातील माणूस येथे काय करणार. पण आबांनी एकदा मनावर घेतले म्हणजे ते काम परीपूर्णरित्या करणारच.त्यांच्या धार्मिक कार्याचे फळ म्हणजे **प.पू.विद्या नृसिंह भारती स्वामी करवीर पीठ कोल्हापूर श्रीमंत जगत्‌गुरू शंकराचार्य यांच्या हस्ते 'श्री स्वामी योगी' हा सन्मान** त्यांना प्रदान करण्यात आला. नुसती मंदिरात सेवा केल्यामुळे हे झाले नाही तर त्यांनी **सुविचारांचे व संत बोध तत्वांचे पुस्तक लिहून प्रकाशीत** केले. विशेष म्हणजे **सदर पुस्तकाच्या आतापर्यंत ३ आवृत्त्या प्रकाशीत** झाल्या आहेत. अशा या कर्म व धर्म वीराला उदंड आयुष्य लाभो व त्यांच्या हातून अशीच परमेश्वर सेवा घडो ही सदिच्छा!

**शब्दांकन – हौसाराम घोडके**

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री. सुनील तोटे (suniltote11@gmail.com) (Cell : 9823415531) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून 'पारनेर भवन', मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

श्रीमान ____________________

____________________

____________________

संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ढुबे**
ए-६०५, ''शुभकल्याण'' नांदेड सिटी,
सिंहगड रोड, पुणे ४११०४१. मो.: ९४२२०२६२२५

Website : http://www.parnermitramandalpune.com/

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
कार्याध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.: ९४२०६९६७९०